“ हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात कंधार तालुक्याचे योगदान ”

Ãवामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड करिता

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विषयातील

पीएच. डी. पदवी साठी सादर करण्यात येणारा

संशोधन आराखडा

:: संशोधक ::

प्रा. वसंत निवृत्ती बंडे

इतिहास विभाग प्रमुख

सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर

:: मार्गदर्शक ::

डॉ. सुखदेव पिराजी बलखंडे

इतिहास विभाग प्रमुख

कै. बाबुराव पाटील महाविद्यालय, हिंगोली

´ÖÖ“Ö -2016

हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात कंधार तालुक्याचे योगदान

प्रस्तावना

भारतात ५६३ पेक्षा अधिक देशी संस्थाने आणि राज्ये होती. त्यापैकी एक हैदराबाद संस्थान होते. या संस्थानात मराठवाडा, तेलंगण व कर्नाटक या तीन प्रदेशांचा समावेश होता. या तिन्ही प्रदेशातील लोकांची मातृभाषा अनुक्रमे मराठी, तेलगू आणि कन्नड होती. या राज्यात ९०% हिंदू समाज आणि १०% मुस्लिम समाज होता. परंतू या राज्याचे राज्यकर्ते मुस्लिम होते. या राज्यात एकूण ७ निजाम होऊन गेले. मीर उस्मान अलीखान बहादुर हे हैदराबाद राज्याचे सातवे आणि शेवटचे राज्यकर्ते होते. हैदराबाद राज्याच्या राज्यकर्त्यांना ‘निजाम ’ या नावाने ओळखले जात होते. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतरही हैदराबादचे निजाम आपले संस्थान भारतात विलीन करण्यास तयार नव्हते. त्यामुळे राज्यातील जनतेने हैदराबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले हेच आंदोलन हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम म्हणून ओळखले जाते. या स्वातंत्र्य संग्रामात नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्याचे योगदान फार मोठे आहे.

विषय निवडीचा उद्देश

नांदेड जिल्ह्यात लोहा , कंधार, नांदेड, नायगाव, धर्माबाद, बिलोली, मुखेड , मुदखेड ,अर्धापुर किनवट ,माहुर, उमरी, भोकर, हदगाव, हिमायतनगर आणि देगलूर इत्यादी (१६) तालुके आहेत. कंधार तालुका हा निजाम काळापासून अस्तित्वात आहे. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात कंधार तालुक्याचे योगदान फार मोठे आहे. इ.स. १९९२ मध्ये कंधार तालुक्याचे विभाजन होऊन लोहा हा तालुका अस्तित्वात आला. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात या तालुक्यातील जनतेने आर्य समाज,

महाराष्ट्र परिषद आणि हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली निजाम सरकारच्या

विरोधात लढा दिला. हा लढा ऐतिहासिक असून अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या लढयाचा इतिहास आणि त्यामधील कंधार तालुक्यातील जनतेचे योगदान यावर संशोधन होणे आवश्यक असल्यामुळे पीएच.डी. संशोधनासाठी 'हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात कंधार तालुक्याचे योगदान' या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :

1) कंधार तालुक्याचा भौगोलिक व ऐतिहासिक आढावा घेणे
2) कंधारच्या व परिसराच्या इतिहासावर थोडक्यात प्रकाश टाकणे.
3) हैदराबाद राज्याची राजकीय माहिती थोडक्यात विशद करणे.
4) हैदराबाद राज्यातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक माहितीचा थोडक्यात आढावा घेणे.
5) आर्य समाजाच्या चळवळीत कंधार तालुक्याचे योगदान स्पष्ट करणे.
6) महाराष्ट्र परिषदेच्या कार्यात कंधार तालुक्याचे योगदान स्पष्ट करणे.
7) हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या लढयात कंधार तालुक्याने बजावलेल्या भूमिकेचा आढावा घेणे.
8) हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात होऊन गेलेल्या हुतात्म्यांच्या कार्याचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहितके :

1) कंधार तालुक्याला प्राचीन इतिहास व संस्कृतीचा वारसा मिळालेला †ÖÆê.
2) हैदराबाद राज्याची स्थापना मोगल साम्राज्याचे दक्षिणेचे सुभेदार निजाम उल-मुलक यांनी मोगल सम्राटास दगा देऊन केली.
3) हैदराबाद राज्यात हिंदू समाजावर निजाम सरकार व मुस्लिम समाजाकडून अन्याय अत्याचार केले जात होते.
4) आर्य समाजाच्या चळवळीत कंधार तालुक्यातील जनतेने मोठया

प्रमाणात योगदान दिले.

5) महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनात व कार्यात कंधार तालुक्यातील जनतेचा सहभाग महत्त्वाचा ठरला.

6) हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या नेतृत्वाखाली झालेल्या हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात कंधार तालुक्यातील जनतेची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली.

7) हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात कंधार तालुक्यात ६१ हुतात्मे झाले.

संदर्भ साधने :

हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात कंधार तालुक्याचे योगदान या विषयावर संशोधन करण्यासाठी प्रकाशित आणि अप्रकाशित मुळ कागदपत्रे, प्रकाशित मुळ संदर्भीय ग्रंथ आणि दुय्यम संदर्भ ग्रंथाचा आधार म्हणुन उपयोग होणार आहे. या शिवाय स्वातंत्र्य सैनिक आणि त्यांच्या नातेवाईकांच्या मुलाखती घेवूनही त्यामधुन मिळालेल्या माहितीच्या आधारे संदर्भ साधने म्हणुन उपयोग केला जाणार आहे.

संशोधन पद्धती :

हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात कंधार तालुक्याचे योगदान या विषयावरील संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे.

संशोधनाची आवश्यकता :

भारत देश स्वतंत्र्य झाल्यानंतर भारतातील संस्थाने व राज्ये भारतात कशी विलीन करुन घ्यावयाची हा मोठा प्रश्न भारत सरकारपुढे पडला होता. तरीही, मोठया हिमतीने भारत सरकारने अनेक संस्थाने भारतात विलीन करुन घेतली. परंतू काश्मिर, जुनागढ व हैदराबाद ही तीन संस्थाने भारतात विलीन होण्यास तयार नव्हती. यापैकी काश्मिर व जुनागढ अनेक डावपेच करुन भारतात विलीन करुन घेतले. परंतू हैदराबाद संस्थानाच्या विलीनीकरणाचा प्रश्न सुटला. नाही. शेवटी राज्यातील जनतेने हैदराबाद

संस्थान भारतात विलीन करुन घेण्यासाठी निजाम सरकारच्या विरोधात स्वातंत्र्य संग्राम केला. या स्वातंत्र्य संग्रामात नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्याचे योगदान फार मोठे आहे. त्याचा इतिहास प्रकाशात येण्यासाठी या विषयावर संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

पूर्व संशोधनाचा आढावा

हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासावर अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी लिहुन प्रसिध्द केल्या, अनेक अभ्यासक आणि संशोधकांनी विविध पैलूवर व घटकावर संशोधन केले परंतू या संशोधनातून हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या संपूर्ण इतिहासावर प्रकाश पडला होता असे नव्हे तर अशा अनेक घटना आणि घटकांवर प्रकाश टाकण्यासाठी संशोधनाची गरज आहे. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात कंधार तालुक्यातील जनतेचे फार मोठे योगदान आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम तालुक्यातील ६१ जण हुतात्मा झाले. परंतू या तालुक्यातील जनतेने हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या कार्यावर आजपर्यंत कोणीही संशोधन केलेले नाही. त्यामुळेच हा इतिहास प्रकाशात येण्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेतले आहे. मी माझ्या शोध प्रबंधाची मांडणी खालील प्रकरणात करणार आहे.

प्रकरण पहिले

¯ÖÖÀ¾Ö³Ö´ÖÖß

पार्श्वभुमी हे शोध प्रबंधातील पहिले प्रकरण आहे. या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना, विषय निवडीचा उद्देश, संशोधनाची उद्दिष्टये, गृहितके , संदर्भ साधने, संशोधन पध्दती, संशोधनाची आवश्यकता, पूर्व संशोधनाचा आढावा आणि संदर्भ साधनांचे परिक्षण याची माहिती दिली जाणार आहे.

प्रकरण दुसरे

भौगोलिक व ऐतिहासिक मागोवा

भौगोलिक व ऐतिहासिक मागोवा हे शोध प्रबंधातील दुसरे प्रकरण आहे. या प्रकरणात कंधार तालुक्याची भौगोलिक स्थिती सर्वप्रथम देण्यात येऊन नंतर कंधार तालुक्याच्या इतिहासावर प्रकाश टाकण्यात येईल. कंधार तालुक्याला प्राचीन इतिहास व संस्कृतीचा वारसा मिळालेला आहे. या प्रकरणात प्राचीन ते इ.स.१९४८ पर्यंतचा कंधार तालुक्याचा ऐतिहासिक मागोवा घेतला जाईल.

प्रकरण तिसरे

†Öµö ÃÖ´ÖÖ•Ö ¾Ö ´ÖÆÖ¸üÖÂ™ü ¯Ö×¸üÂÖ¤ü

आर्य समाज व महाराष्ट्र परिषद हे शोधप्रबंधातील तिसरे प्रकरण आहे. या प्रकरणात सर्व प्रथम Æî¤ü¸üÖ²ÖÖ¤ü राज्याच्या स्थापनेचा इतिहास दिला जाईल. यानंतर राजकीय, सामाजिक, धार्मिक स्थितीचा आढावा घेतला जाईल. यानंतर कंधार तालुक्यातील जनतेने आर्य समाजाच्या चळवळीत व महाराष्ट्र परिषदेच्या कार्यात दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण चौथे

हैदराबाद स्टेट कॉंग्रसेचे आंदोलन

Æî¤ü¸üÖ²ÖÖ¤ü स्टेट कॉंग्रेसचे आंदोलन हे प्रबंधातील चौथे प्रकरण आहे. या प्रकरणात Æî¤ü¸üÖ²ÖÖ¤ü स्टेट कॉंग्रेसच्या आंदोलनात कंधार तालुक्यातील जनतेच्या योगदानाचा आढावा घेतला जाणार आहे. Æî¤ü¸üÖ²ÖÖ¤ü स्टेट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली झालेला सत्याग्रह , वंदे मात्‌रम चळवळ, झेंडा सत्याग्रह , जंगल सत्याग्रह व सशस्त्र लढयात कंधार तालुक्यातील जनतेचा सहभाग उल्लेखनीय आहे.

प्रकरण पाचवे

ÆÌÝÖÖÝ´Ö

हुतात्मे हे शोध प्रबंधाचे पाचवे प्रकरण आहे. या प्रकरणात कंधार तालुक्यातील हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात होऊन गेलेले हुतात्मे व त्यांच्या कार्याची माहीती दिली जाणार आहे. कंधार तालुक्यात ६१ हुतात्मे होऊन गेले. त्यापैकी एकटया कल्हाळी गावात ३७ हुतात्मे झाले आहेत.

प्रकरण सहावे

निष्कर्ष व उपसंहार

निष्कर्ष व उपसंहार हे शोध प्रबंधातील सहावे प्रकरण आहे. या प्रकरणात संशोधनाअंती निष्कर्ष मांडले जाणार आहेत व उपसंहार दिला जाणार आहे. संशोधनाचा प्रस्तुत आराखडा हा संभाव्य आराखडा आहे. संदर्भ साधनांच्या उपलब्धतेनुसार प्रकरणाच्या संख्येत कमी अधिक बदल आणि प्रकरणाच्या शीर्षकातही बदल होऊ शकतो.

ÃÖ¤ü³Ö ÃÖ“Öß

1) डॉ. कठारे अनिल, मराठवाडयाचा इतिहास, एजुकेशनल पब्लिशर्स , औरंगाबाद

2) डॉ. रोडे सोमनाथ, मराठवाडयाचा इतिहास

3) श्री. भालेराव अनंत, हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन, गृह

4) श्री. नाईक नरेंद्र, काळोखातील अग्निशिखा, दिलीपराज प्रकाशन, पुणे

5) श्री.गायकवाड नरेंद्र मराठवाडयातील दलित चळवळ आणि हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम , सुगावा प्रकाशन ,पुणे १९९०

6) डॉ. कोडेकर आर.एस.,मराठवाडयाचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातूर 2013

7) डॉ. नरवडे एस. एस. ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबाद संस्थान, सुगावा प्रकाशन पुणे ,१९८८

8) Kate P.V., Marathwada Under The Nizam›s, Mittal Prakashan, New Delhi

9) Kaul Santosh, Indian Freedem movement and States , Anmol Prakashn, Pune

संशोधक

प्रा. वसंत निवृत्ती बंडे
इतिहास विभाग प्रमुख
सरस्वती संगीत कला महाविद्यालय,
»ÖÖŸÖ¸

मार्गदर्शक

डॉ. सुखदेव पिराजी बलखंडे
इतिहास विभाग प्रमुख
कै. बाबुराव पाटील महाविद्यालय,
हिंगोली